जिल्हाधिकारी तथा जिल्हादंडाधिकारी यांचे कार्यालय, सिंधुदुर्ग

(सामान्य प्रशासन विभाग)

कार्यालय दुरध्वनी क्र. ०२३६२/२२८६०८/२२८८४७ फॅक्स नं.०२३६२/२२८५८९

Email Id- colloffice@gmail.com


GAD - 3701/3/2020-COLL-EN

दिनांक - 02/06/2020

वाचले: 1) India Meteorological Department Earth System Science Organisation (Ministry Of Earth Science), New Delhi Bulletin No:13(ARB/02/2020) Dated-01/06/2020

2) आपती व्यवस्थापन अधिनियम - 2005

## आपती व्यवस्थापन अधिनियम - 2005 चे कलम 34 प्रमाणे आदेश

ज्याअर्थी, संदर्भीय क्र. 1 अन्वये भारतीय हवामान खाते, नवी दिल्ली यांनी दिनांक 02 ते 03 जून, 2020 या कालावधीत अरबी समुद्र पश्चिम किनारपट्टी लगतच्या जिल्हयांना चक्रीवादळाचा तडाखा बसण्याची शक्यता असलेबाबत अंदाज वर्तविलेला आहे.

सिंधुदुर्ग जिल्हा हा सुध्दा अरबी समुद्राच्या पश्चिम किनारपट्टी लगत असल्याने सिंधुदुर्ग जिल्हयाला चक्रीवादळाचा तडाखा बसण्याची शक्यता नाकारता येत नाही. भारतीय हवामान खाते, नवी दिल्ली यांनी वर्तविलेल्या अंदाजानूसार चक्रीवादळ सिंधुदुर्ग जिल्हयाच्या किनारपट्टीवर धडकल्यास किनारपट्टी लगतची गावे / वाडया व झाडे, मोडकळीस आलेली घरे / पक्की घरे यांचे नुकसान होवून त्यामुळे जिवित व वित्त हानी होण्याची दाट शक्यता आहे. तसेच या चक्रीवादळामुळे जिल्हयाच्या किनारपट्टीलगतचा भाग वगळता अन्य भाग ही, प्रभावित होवू शकतो. त्यामुळे जिल्हयातील नागरिकांची जिवित व वित हानी होवू नये यासाठी ठोस उपाययोजना करणे आवश्यक आहे, अशी माझी खात्री झाली आहे.

त्याअर्थी, **मी के. मंजुलक्ष्मी, जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष, जिल्हा आपती व्यवस्थापन प्राधिकरण, सिंधुदुर्ग** आपती व्यवस्थापन अधिनियम - 2005 चे कलम 34 अन्वये मला प्राप्त अधिकारानुसार सिंधुदुर्ग जिल्हयातील लोकांची चक्रीवादळामुळे जिवित व वित हानी होवू नये म्हणून दिनांक 03 जून, 2020 रोजी लोकांना त्यांच्या अत्यावश्यक सेवा विषयक बाबीसाठी वगळून अन्य कोणत्याही गोष्टीसाठी जिल्हयात एका ठिकाणावरुन दुसऱ्या ठिकाणी संचार करणेस या आदेशान्वये बंदी आणत आहे. सदर कालावधीत लोकांना घराबाहेर पडण्यास प्रतिबंध करण्यात येत आहे. लोकांनी घरातच सुरक्षित रहावे.

तथापि, नैसर्गिक आपती काळात आवश्यक त्या उपाययोजना करण्याच्या अनुषंगाने आपती व्यवस्थापन अधिनियम - 2005 अंतर्गत कार्यरत असणाऱ्या जिल्हयातील शासकीय यंत्रणा यांना सदर आदेश लागू राहणार नाहीत.

**सदरचा आदेश आज दिनांक 02/06/2020 रोजी माझ्या सही व शिक्यानिशी निर्गमित केला आहे.**

( के. मंजुलक्ष्मी )

**जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष**

**जिल्हा आपती व्यवस्थापन प्राधिकरण, सिंधुदुर्ग**

**प्रत - माहितीसाठी तथा आवश्यक त्या कार्यवाहीसाठी**

1) मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, सिंधुदुर्ग

2) पोलीस अधीक्षक, सिंधुदुर्ग

3) उपविभागीय दंडाधिकारी (सर्व)

4) तहसीलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी (सर्व)

5)जिल्हा माहिती अधिकारी, सिंधुदुर्ग

Scanned with CamScann